महाराष्ट्र शासन

पोलीस अधीक्षक कार्यालय, पुणे ग्रामीण.

चव्हाणनगर, पाषाण रोड, पुणे -411008
दुरध्वनी क्र.020-25657878 फॅक्स क्र.020-25674641
ई मेल- sp.pune.r@maha.gov.in.

(आस्थापना शाखा)

जा.क्र.आशा-1अ/अनुकंपा-पो.भ./नेमणूक/2026/ई- पुणे ग्रामीण, दिनांक : /09/2026

विषय :- अनुकंपा तत्त्वावर पोलीस शिपाई पदी अस्थायी व तात्पुरत्या स्वरुपात नियुक्तीबाबत.

संदर्भ :-
01) महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम, 2011
02) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक अकंपा 1225/ प्र.क्र.121/ म.लो.आ. दिनांक 17 जुलै, 2025
03) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक अकंपा 1225/ प्र.क्र. 194/म.लो.आ. दिनांक 22 ऑगस्ट, 2025
04) महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक : आरसीटी-01003/प्र.क्र.677/पोल-5(ब) दिनांक 23 फेब्रुवारी, 2004
05) मा.अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, म.रा.मुंबई यांचेकडील पत्र क्र. अपोमसं/प्रशिक्षण/पोशि भरती/अनुकंपा/2025 दिनांक 25/08/2025
06) सौ.सोनाली प्रदिप मालुसरे यांचा दि.19.01.2022 रोजीचा परिपुर्ण अर्ज (परिशिष्ट-ब).
07) या कार्यालयाचे पत्र क्र.आशा-2/अनुकंपा/मालुसरे/2022/3760, दि.01.03.2022
08) मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई येथे दाखल मूळ याचिका क्र.907/2022 वर दि.24.04.2024 रोजी झालेला न्यायनिर्णय
09) शासन पत्र, विधी व न्याय विभाग, क्र.616-2024(E), दि.25.09.2024 .
10) शासनाच्या वतीने मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई यांचे न्यायनिर्णयाचे विरोधात मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल केलेले रिट पिटीशन क्र.ST14494/2024, दि.09.10.2024
11) महाराष्ट्र शासन, गृहविभाग, पत्र क्र.H.D.21010/20/2026-POL5B, दि.04.03.2026
12) या कार्यालयाचे पत्र क्र.आशा-4/अनुकंपा/मालुसरे/रिट पिटीशन/2026/3329, दि.03.07.2026
13) महाराष्ट्र शासन, गृहविभाग, पत्र क्र.H.D.21010/20/2026-POL5B, दि.24.06.2026
14) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडील पत्र क्र.पोमसं/डी-60-326/3/2024, दि.30.06.2026
15) या कार्यालयाचे इंग्रजी पत्र क्र.SB-4/Malusare/W.P.14494-2024/2026/3525, दि.23.07.2026
16) मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचा न्यायनिर्णय दि.07.08.2026

--- 000 ---

नियुक्ती आदेश :-

या जिल्ह्याचे आस्थापनेवरील दिवंगत पोहवा/373 कैलास सीताराम पासलकर तत्कालीन नेमणुक खेड पोलीस ठाणे, पुणे ग्रामीण यांचे शासकीय सेवेत असताना दि.05.09.2021 रोजी निधन झाले आहे. सदरबाबत त्यांची मुलगी श्रीमती सोनाली प्रदिप मालुसरे यांनी अनुकंपा तत्वावर पोलीस शिपाई पदावर नियुक्तीसाठी आवश्यक ती सर्व कागदपत्रे या कार्यालयास सादर केली होती. सदर प्रकरणी दिवंगत पोहवा/373 कैलास सीताराम पासलकर यांना तीन अपत्ये असल्याने असल्याने, श्रीमती मालुसरे यांची विनंती अमान्य करण्यात आली होती. त्यावर श्रीमती मालुसरे यांनी मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई येथे दाखल मूळ याचिका क्र.907/2022 दाखल केली होती. सदर याचिकेवर उपरोक्त संदर्भ क्र.08 अन्वये दिवंगत पोहवा/373 कैलास सीताराम पासलकर यांच्या तीन अपत्यांपैकी दोन अपत्य हयात असल्याने श्रीमती मालुसरे यांना अनुकंपा प्रतिक्षा यादीवर घेण्याबाबत न्यायनिर्णय दिलेला आहे.

2. सदर मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई यांचे न्यायनिर्णयाचे विरोधात, शासनाकडून संदर्भ क्र.09 चे पत्रान्वये दिलेल्या संमतीनुसार मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे संदर्भ क्र.10 अन्वये दि.09/10/2024 रोजी रिट पिटीशन क्र. ST14494/2024 दाखल करण्यात आले आहे. त्यानंतर शासनाचे संदर्भ क्र.11 चे आदेशानुसार श्रीमती मालुसरे यांना अनुकंपा प्रतिक्षा सूचीवर घेण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. सदर मान्यतेनुसार या कार्यालयाचे संदर्भ क्र.12 चे पत्रानुसार

दाखल केलेल्या रिट पिटीशनबाबत पुढील आदेश होण्यासाठी अहवाल सादर करण्यात आलेला असून, त्यावर शासनाचे संदर्भ क्र.13 अन्वये सदर रिट पिटीशन मागे घेण्याबाबत सूचित केले आहे. तसे पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई कार्यालयाकडून संदर्भ क्र.14 चे पत्रान्वये सुचित करण्यात आलेले आहे. त्यास अनुसरुन या कार्यालयाचे संदर्भ क्र.15 अन्वये मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल रिट पिटीशन मागे घेण्याबाबत (Withdrawn) अहवाल सादर करण्यात आलेला असून, त्यावर मा.न्यायालयाने संदर्भ क्र.16 अन्वये मान्यता दिलेली आहे. त्यानुसार श्रीमती मालुसरे यांचे नाव पोलीस शिपाई पदाचे अनुकंपा प्रतिक्षा यादीमध्ये अनुक्रमांक (65) वर घेण्यात आले आहे.

3. श्रीमती मालुसरे या कागदपत्र/प्रमाणपत्र पडताळणी व शारीरिक मोजमापमध्ये पात्र ठरलेल्या आहेत. वैद्यकीय तपासणी आणि चारित्र्य व वर्तणुक पडताळणीत योग्य/पात्र ठरल्याने, त्यांना पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण पोलीस घटकात **"पोलीस शिपाई" गट-क** संवर्गात अनुकंपातत्वावर खालील नमुद अटी व शर्तीचे अधिन राहुन **अस्थायी व निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात** नियुक्ती देण्यात येत आहे. नियुक्ती आदेश प्राप्त होताच सदर उमेदवारांनी तात्काळ पोलीस मुख्यालय, पुणे ग्रामीण येथे हजर व्हावे.

अ. क्र.	प्रतिक्षा यादी क्र.	उमेदवाराचे नाव	संपूर्ण पत्ता व भ्रमणध्वनी क्र.	जात/ प्रवर्ग	भरती प्रवर्ग
1	65	श्रीमती सोनाली प्रदिप मालुसरे	रा.सर्व्हे नं.16, साईसिद्धी चौक, कुलस्वामिनी दर्शन, फ्लॅट नं.6, आंबेगाव पठार, पुणे -411016 मो.नं.8329399962	हिंदू मराठा (खुला)	अनुकंपा

4. महाराष्ट्र पोलीस नियमावली 1999, भाग-1 मधील नियम क्रमांक 63 मध्ये दिलेल्या अधिकारानुसार व महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम, 2011 तसेच त्यामध्ये शासनाने वेळोवेळी केलेल्या सुधारणा, पोलीस अधिनियम 1951, मुंबई पोलीस (शिस्त व अपील) नियम 1956, तसेच मुंबई पोलीस संहिता-1959 व तद्अनुषंगाने वर नमुद उमेदवार यांना पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण आस्थापनेवर **"पोलीस शिपाई"** गट-क या संवर्गात सुधारीत वेतन मॅट्रिक्स मधील वेतन स्तर एस-7 रु.21700-69100 मध्ये मुळ वेतन रु.21700 या प्रारंभिक वेतनावर (विशेष वेतन रुपये 750/- व अधिक नियमानुसार देय असणारे भत्ते याप्रमाणे) पोलीस मुख्यालय, पुणे ग्रामीण येथे हजर झाल्याचे दिनांकापासुन लागु राहतील.

अटी व शर्ती खालीलप्रमाणे

01) सदरची नियुक्ती ही अस्थायी व निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची राहील. शासनास त्यांच्या सेवेची आवश्यकता नसल्यास कोणत्याही प्रकारचे कारण न दर्शविता अथवा आगाऊ सुचना/नोटीस न देता केंव्हाही सेवेतुन सेवामुक्त करण्यात येईल.

02) पोलीस शिपाई पदावर नियुक्ती ही अस्थायी व निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची असल्याने कोणतेही कारण न देता **मुंबई पोलीस नियमावली** 1959 **भाग**-1 **मधील नियम क्रमांक** 78(1)(i) **ते** (viii) अन्वये आपली सेवा केव्हाही समाप्त करण्याची तरतुद आहे, अथवा मुंबई पोलीस (शिक्षा व अपिल) नियम, 1956 मधील तरतुदीनुसार सेवा समाप्त करण्यात येईल.

03) **महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम**, 2011 **मधील नियम** 12 **नुसार पोलीस शिपाई या पदावर नियुक्त केलेल्या उमेदवारास या पदासाठी विहित केलेले प्रशिक्षण पूर्ण करावे लागेल व संबंधित परीक्षा चार संधीमध्ये उत्तीर्ण व्हावे लागेल. जर चार संधीमध्ये तो परीक्षा उत्तीर्ण झाला नाही तर त्याची सेवा समाप्त करण्यात येईल. या कालावधीत वार्षिक वेतनवाढ अनुज्ञेय असणार नाहीत. परीक्षा विहित संधीत उत्तीर्ण झाल्यानंतर वेतनवाढ देय होईल, परंतु वेतनवाढ रोखुन धरल्यामुळे देय होणारी थकबाकी मिळण्याचा हक्क असणार नाही.**

04) आपणास महाराष्ट्र शासन नियमाप्रमाणे मराठी भाषा परिक्षा उत्तीर्ण होण्यापासुन सुट मिळाली नसेल तर मराठी भाषा परीक्षा त्यासंबंधी केलेल्या नियमानुसार उत्तीर्ण व्हाव्या लागतील. पोलीस शिपाई या पदावर नियुक्त केलेल्या उमेदवारांना मुंबई पोलीस मॅन्युअल 1959, मुंबई (शिस्त व अपील) नियम 1956 व राज्य शासनाने वेळोवेळी विहित केलेले अन्य नियम लागु होतील. उमेदवाराने महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या मराठी भाषेच्या परीक्षा शासन निर्णय क्र.मभाप्र-1087/14/ सीआर-2/87/20 दिनांक 30/12/1987 अन्वये नियुक्ती दिनांकापासून चार वर्षाच्या कालावधीत उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. अन्यथा शासकीय आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल.

05) नियुक्ती स्विकारल्यानंतर पोलीस शिपाई पदाचा राजीनामा दिल्यास पुनर्नियुक्तीचा विचार केला जाणार नाही.

06) महाराष्ट्र शासन, गृह विभाग, मुंबई शासन आदेश क्रमांक आरसीटी-0311/प्र.क्र.228/पोल-5-अ, दिनांक 16/06/2011 अन्वये निर्गमित केलेल्या महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम 2011 मधील तरतुदीनुसार आपली पात्रता, शैक्षणिक प्रमाणपत्र पडताळणीचे वेळी तसेच भविष्यात कोणत्याही स्तरावर नियमानुसार कमी असल्याचे अथवा आपण पोलीस शिपाई पदासाठी आवश्यक असलेली पात्रता पुर्ण करीत नसल्याचे आढळुन आल्यास कोणतीही पुर्व सुचना न देता आपली सेवा समाप्त करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

07) महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र.बीसीसी 2011/प्र.क्र.1064/2011/ 16-ब दिनांक 12/12/2011 अन्वये नियुक्ती आदेश प्राप्त झाल्यानंतर **मागासवर्गीय उमेदवारांनी नियुक्ती आदेशाच्या**

दिनांकापासुन 06 महिन्याच्या आत जात प्रमाणपत्राची वैधता संबंधित जात पडताळणी समितीकडून करुन घेणे बंधनकारक राहील. जात वैधता प्रमाणपत्र पडताळणीच्या अधीन राहू निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती करण्यात आलेली असल्याने, जात प्रमाणपत्राची वैधता संबंधीत जात पडताळणी समितीकडुन करुन घेणे आवश्यक राहील. तसेच उमेदवाराने नियुक्ती स्विकारताच जात वैधता तपासणी करण्यासाठी प्रस्ताव संबंधीत जात पडताळणी समितीकडे सादर करावा व जात पडताळणी समितीने दिलेल्या पोहोच पावतीची साक्षांकित प्रत या कार्यालयास सादर करावी. जात पडताळणी समितीने जात प्रमाणपत्र अवैध ठरविल्यास दिलेले नियुक्ती आदेश त्वरित रद्द करण्यात येतील व महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्यांच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम 2000 यातील तरतूदीनुसार कारवाई करण्यात येईल.

08) याचिका क्र.2136/2011 व अन्य याचिकांवर मा.उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दि.25/08/2011 रोजी दिलेल्या आदेशाच्या विरोधात मा.सर्वोच्च न्यायालय दिल्ली येथे एस.एल.पी. दाखल करण्यात आली आहे. यावर सर्वोच्च न्यायालयाकडून जे काही आदेश दिले जातील त्या आदेशाच्या अधीन राहून सदरची नियुक्ती देण्यात येत आहे.

09) पोलीस शिपाई पदावर नियुक्ती दिल्यानंतर भविष्यात कधीही उमेदवारांच्या चारित्र्य पडताळणी अहवाल संदर्भात प्रतिकुल फेर अहवाल प्राप्त झाल्यास अथवा त्याबाबत काही आक्षेपार्ह बाबी आढळुन आल्यास, उमेदवाराने स्वहस्ताक्षरात भरुन दिलेला साक्षांकन नमुना फॉर्ममध्ये भरुन दिलेली माहिती खोटी अथवा चुकीची दिल्याचे निदर्शनास आल्यास, शैक्षणिक प्रमाणपत्रे व जातीचे दाखले/खेळाचे प्रमाणपत्रे व इतर प्रमाणपत्रे तसेच कोणतीही खोटी माहिती असल्याचे निदर्शनास आल्यास त्यांना कोणतीही पुर्व सुचना न देता त्यांची सेवा संपुष्टात आणली जाईल. त्याबाबत कोणतीही तक्रार अथवा दावा करण्याचा हक्क राहणार नाही.

10) आपले विरुध्द फौजदारी खटले न्यायप्रविष्ठ आहेत किंवा नैतिक अध:पतनाच्या गुन्ह्यात आपणास दोषी ठरवून न्यायालयाने शिक्षा दिल्याचे निदर्शनास आल्यास किंवा इतर मार्गाने काहीही प्रतिकुल बाबी निदर्शनास आल्यास कोणतीही पूर्वसुचना/नोटिस न देता आपली सेवा समाप्त करण्यात येईल आणि आपण कायदेशीर कार्यवाहीस पात्र राहाल.

11) प्रशिक्षण कालावधीत आपणास कोणत्याही प्रकारची इजा अगर दुखापत झाल्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही, त्याबद्दल कोणत्याही प्रकारच्या नुकसान भरपाईस ते पात्र राहणार नाहीत.

12) प्रशिक्षण कालावधीत कांही दोष आढळल्यास किंवा कोणतेही बेशिस्त, गैरवर्तन किंवा नितीमुल्यांचा ऱ्हास करणारे अशोभनिय कृत्य केल्यास, पोलीस सेवेत स्वारस्य न दाखविल्यास किंवा प्रशिक्षण कालावधीत वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या पूर्वपरवानगीशिवाय गैरहजर राहिल्यास, त्यांना कोणत्याही प्रकारची पुर्वसुचना/नोटीस न देता, त्यांची सेवा समाप्त (Terminate) करण्यात येईल. प्रशिक्षण कालावधीत आपणांस कोणत्याही प्रकारची रजा मिळणार नाही. तसेच सक्षम अधिकाऱ्याच्या परवानगीशिवाय मुख्यालय परिसर सोडून बाहेर जाता येणार नाही.

13) पोलीस दलात सेवेच्या अनुषंगाने योग्यता व पात्रता तपासण्यासाठी उमेदवाराची पोलीस प्रशिक्षण विद्यालयात मानसिक चाचणी (Psychological Test) घेण्यात येईल. सदर चाचणीत आपण **अपात्र** ठरल्यास आपली सेवा कोणतीही पुर्व सुचना न देता अथवा नोटीस न देता समाप्त करण्यात येईल.

14) ज्या प्रवर्गातून/संवर्गातून पोलीस शिपाई पदी भरती करण्यात आली आहे, तो प्रवर्ग/संवर्ग नंतर बदलता येणार नाही.

15) पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण घटकात पोलीस शिपाई पदावर नियुक्ती झाल्यानंतर अन्य पोलीस घटकात आंतरजिल्हा बदलीसंदर्भात महाराष्ट्र शासन गृहविभाग, शासन निर्णय क्र.संकिर्ण-1017/3843/प्र.क्र.469/ पोल-5ब, दिनांक .26/10/2017 नुसार महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम, 2011 मधील नियम 3(2) उपखंड (अ) तरतुदीमधील सुधारणा नुसार पोलीस शिपाई ते सहाय्यक पोलीस उप निरीक्षक दर्जापर्यांच्या पोलीस अमंलदारांच्या घटक आस्थापना बदली नियमावलीमधील अटींच्या पुर्ततेनुसार कार्यवाही करण्यात येईल.

16) पोलीस शिपाई पदावर रुजू झाले तारखेपासून तीन महिन्याचे आत आपणास महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.सीआर-1079/2059/223/11, दि.20/11/1980 नुसार विहित केलेले मत्ता व दायित्व (Assets and Liabilities) बाबतचे विवरणपत्र स्वत:हून भरुन पोलीस अधीक्षक कार्यालय, पुणे ग्रामीण येथे सादर करणे बंधनकारक आहे.

17) नियुक्तीनंतर आपणास पोलीस शिपाई पदास लागू असलेली, महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्र.अंनियो 1005/126/सेवा-4, दिनांक 31/10/2005 अन्वये दि.01 नोव्हेंबर 2005 किंवा त्यानंतर त्यांची शासकीय सेवेतील नियुक्तीनंतर **"नवीन परिभाषीत अंशदान निवृत्ती वेतन योजना"** लागु ठरेल. सध्या अस्तित्वात असलेली निवृत्ती वेतन योजना म्हणजे महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम 1982 व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतनाचे अंशराशीकरण) नियम 1984 आणि सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना लागू होणार नाही. तसेच शासन वित्त विभाग निर्णय क्र.अनियो-2012/प्र.क्र.96/सेवा-4, दिनांक 21/08/2014 नुसार नविन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना यापुढे "राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना (एनपीएस)" या नावाने लागु राहील.

18) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक रानियो-2022/प्र.क्र./सेवा-4 दिनांक 31/03/2023 परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना/ राष्ट्रीय निवृत्ती वेतन प्रणाली अंतर्गत कर्मचाऱ्यांचा सेवाकालावधीत मृत्यू झाल्यास त्याच्या कुटूंबियांना कुटूंब निवृत्तीवेतन आणि मृत्यु उपदान व रुग्णता सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्याला कुटूंब

निवृत्तीवेतन आणि सेवा उपदान तसेच शासन सेवेतून निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना सेवा उपदान मंजूर करणेबाबत मधील नियम-6 नुसार कुटूंबाचा तपशिल व विकल्पाचा नमुना नियुक्ती दिनांकापासुन 8 दिवसाचे आत या कार्यालयाकडे सादर करावा.

19) शासन निर्णय क्र.अकंपा/1000/प्र.क्र.20/2000/08, दि.28/03/2001 अन्वये, दि.31/12/2001 नंतर तिसरे अपत्य झालेल्या दिवंगत कर्मचाऱ्यांचे कुटूंबियास अनुकंपा तत्वावरील नियुक्तीसाठी पात्र समजले जाणार नाही. निवड झालेल्या उमेदवाराचे बाबतीत महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र.एसआरव्ही-2000/प्र.क्र.17/2000/12, दि.01 जुलै,2005 अन्वये महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापन) नियम, 2005 मधील नियम-4 नमुना-अ नुसार ह्यात असलेल्या मुलांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर दिनांक 28 मार्च 2006 व तद्नंतर जन्माला आलेल्या मुलामुळे अनर्ह ठरविण्यास पात्र ठरतील.

20) महाराष्ट्र शासन गृह विभाग पत्र क्र.पीएसबी-311/प्र.क्र.521/पोल-5अ, दि.26 सप्टेंबर, 2011 व अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचेकडील पत्र क्र. अपोमसं/प्रशि/पोशि भरती 2022-23/173/2023, मुंबई, दिनांक.02/01/2025 अन्वये (1) सध्या कार्यरत पोलीस शिपाई यांची अन्य शासकीय/निमशासकीय पदावर नेमणूक झाल्यास नेमणूकीपुर्वी त्याने विहीत पध्दतीचा अवलंब करुन सक्षम प्राधिकाऱ्यांची अन्य पदावर परीक्षेस बसण्यास परवानगी घेतली असल्यास किंवा परवानगीसाठी तसा अर्ज केला असल्यास अशा प्रकरणी उमेदवारांकडून कोणतेही शुल्क आकारण्यास येवू नये व त्यांना पोलीस शिपाई पदावरुन कार्यमुक्त करण्यात यावे. (2) ज्या उमेदवारांनी पोलीस दलातून इतर घटकांतील पोलीस शिपाई भरतीमध्ये व इतर शासकीय/निमशासकीय विभागातील स्पर्धा परीक्षेमध्ये सहभागी होण्यासाठी संबंधीत सक्षम प्रधिकाऱ्यांची पूर्वपरवानगी घेतलेली नाही. अशा उमेदवारांनी त्यांची ज्या इतर घटकांत निवड झाली आहे त्या घटकात हजर होण्यासाठी राजीनामा मंजुर होण्याबाबतची विनंती केल्यास अशा उमेदवारांचा राजीनामा मंजूर करुन घेवुन त्यांना कार्यमुक्त करण्यापुर्वी त्या उमेदवारांकडून प्रशिक्षण कालावधीत प्रशिक्षणावर झालेला खर्च म्हणून प्रती माह रुपये 2,000/- इतकी रक्कम वसुल करण्यात यावी व त्यानंतर त्यांना कार्यमुक्त करावे. (3) संबधीत उमेदवार हा इतर ठिकाणी खाजगी नोकरीमध्ये (शासकीय व निमशासकीय सेवा वगळून) नियुक्त झाला असेल व ता उमेदवार राजीनामा देत असल्यास अशा उमेदवाराकडून त्यांना अदा केलेले सर्व वेतन व भत्ते (राजीनामा मंजूर होईपर्यंतचे) तसेच त्याचेवर झालेला प्रशिक्षणाचा खर्च म्हणून प्रती महिना रु.2000/- इतका खर्च वसुल करण्यात यावा. त्यानंतरच त्याचा राजीनामा मंजूर करण्यात येईल.

21) महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम 2011 मधील नियम 12 नंतर नव्याने अंतर्भुत करण्यात आलेल्या नियम 13 (संगणक हाताळणी बाबतचे प्रमाणपत्र धारण करणे) नुसार, शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाकडून वेळोवेळी विहित करण्यात येणारे, संगणक हाताळणी बाबतचे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक असून, आपण शासन निर्णय, सा.प्र.वि., क्र.Training 2000/No.61/2001/39, दि.19/03/2003 मधील तरतुदीनुसार नियुक्तीच्या दिनांका पासुन दोन वर्षाच्या आत संगणक हाताळणीबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील, अन्यथा आपली सेवा समाप्त करण्यात येईल. तसेच शासन निर्णय माहिती तंत्रज्ञान (सामान्य प्रशासन विभाग) विभाग क्र.मातंस 2012/प्र.क्र.277/39, दि.04/02/2013 मध्ये नमुद केलेल्या संगणक /माहिती तंत्रज्ञानविषयक 86 प्रमाणपत्रापैकी कोणतेही एक प्रमाणपत्र धारण केलेले असावे.

22) आपणास कर्तव्यावर रुजू होतेवेळी भारतीय राज्य घटनेतील संघराज्यांशी एकनिष्ठ राहण्याबाबत लेखी शपथ घेणे बंधनकारक राहील.

23) शासन पत्र, गृहविभाग क्रमांक आरसीटी-0312/प्र.क्र.228/पुनर्बांधणी-166/पोल-5 अ, दि.11/08/2016 अन्वये, तसेच अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचेकडील पत्र क्र.प्रशिक्षण/पो.शि/भरती/सेवाप्रवेश नियम-सुधारणा/36/2016/4391, दि.07/10/2016 अन्वये महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम, 2011 मधील नियम 3(1)(ड) मध्ये केलेल्या सुधारित तरतूदीनुसार पोलीस भरतीमध्ये पोलीस शिपाई पदाकरिता अर्ज करणाऱ्या उमेदवाराने मोटार वाहन अधिनियम, 1988 मधील कलम 2(21) नुसार हलकी वाहन चालविण्याचा (LMV) परवाना धारण केला असणे आवश्यक आहे. परंतु सदर परवाना धारण न करणाऱ्या उमेदवाराने नियुक्तीनंतर त्यांचे पोलीस प्रशिक्षण पुर्ण झाल्यावर दोन वर्षाच्या आत परवाना धारण न केल्यास निवड रद्द ठरवून सेवा समाप्त करण्यात येईल. **नियुक्तीनंतर चालक कर्तव्यासाठी नेमल्यास चालकाचे कर्तव्यसुध्दा करावे लागेल.**

24) पोलीस शिपाई पदावर नियुक्ती दिल्यानंतर आपणास उच्च शिक्षण अथवा इतर विभागात नियुक्तीसाठी परिक्षा द्यावयाची असल्यास त्या परिक्षेस बसण्यासाठी या कार्यालयाचे पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक राहील.

25) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडील परिपत्रक क्र.पोमसं/6/10/पोशि/भरती / सेवाज्येष्ठता/ 251/2012, दि.17/08/2013 अन्वयेचा स्थायी आदेश क्र.2213 मधील तरतूदीनुसार सेवाज्येष्ठता निश्चित करण्यात येईल.

26) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग राजपत्र भाग-4 अ, दिनांक 30/12/2021 मधील महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) (सुधारणा) नियम 2021 मधील तरतुदीनुसार जन्म तारीख अचुक असलेबाबत हमीपत्र सादर करणे बंधनकारक आहे. त्यानुसार एकदा नोंदविलेल्या जन्म तारखेच्या नोंदीमध्ये बदल करण्याची विनंती स्विकारली जाणार नाही.

27) महाराष्ट्र शासन वित्त विभाग यांचेकडील परिपत्रक क्र.संकिर्ण-2021/प्र.क्र.52/सेवा-3, दिनांक 22/11/2021 अन्वये शासकीय सेवेत नव्याने नियुक्ती झाल्यानंतर किंवा अन्य प्रकारे वेतननिश्चिती/ वेतनवाढी/ अथवा इतर कोणत्याही आर्थीक लाभाच्या / प्रदानाच्या अनुषंगाने संपुर्ण सेवा कालावधीत नियमानुसार अथवा कायद्यानुसार देय व अनुज्ञेय ठरत नसतांना अतिरिक्त रक्कम प्रदान झाल्याची बाब सद्यस्थितीत / भविष्यात शासनाच्या निदर्शनास आल्यास अशी अतिप्रदानाची रक्कम शासनास परत करण्याचे लेखी वचनपत्र देणे बंधनकारक राहील.

28) नियुक्ती दिलेल्या पोलीस शिपाई यांना महाराष्ट्र पोलीस अधिनियम, 1951, महाराष्ट्र पोलीस नियमावली 1999, महाराष्ट्र पोलीस (शिक्षा आणि अपिले) 1956, महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम 1981 व रजा सेवानिवृत्ती इत्यादी प्रयोजनार्थ महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम, 2011 व त्यानंतर शासनाने वेळोवेळी केलेल्या सुधारणा, तसेच महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले नियम, आदेश, परिपत्रके लागु राहतील.

29) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.एसआरव्ही-2018/व्ही.आय.पी.67/प्र.क्र. 207/ कार्या.12 मुंबई दिनांक 28/05/2018 अन्वये महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियम) नियमावली 1982 मधील नियम 4(2) नुसार नियुक्तीचे आदेश निर्गमित झालेल्या तारखेपासुन (30) दिवसाच्या आत रुजू होण्याची तरतुद आहे. सदर कालावधीत उमेदवार रुजू झाला नाही तर तो नोकरीची संधी गमावेल व त्याचे नियुक्ती करिता विचार करण्यात येणार नाही. उमेदवाराने या बाबत गांभीर्याने नोंद घ्यावी.

30) नियुक्तीसाठी पात्र ठरविण्यासाठी आवश्यक त्या बाबींची फेर तपासणी केल्यास किमान विहित पात्रता आढळून येणे आवश्यक आहे. तसे नसल्यास कोणतेही कारण अथवा नोटीस न देता सेवा समाप्त करण्यात येईल.

31) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.अकंपा 1225/प्र.क्र.121/म.लो.आ. दिनांक 17/7/2025 मधील अटी व शर्तीच्या अधीन राहुन अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्यात येत आहे. सदर शासन निर्णयातील अटी व शर्तीचा भंग झाल्यास शासन सेवेतुन अपात्र ठरविण्यात येईल.

32) आपण सादर केलेले वारस प्रमाणपत्र भविष्यात न्यायालयाने अवैध ठरविल्यास अथवा कुटूंबातील अन्य व्यक्तीचे नावाने वारस प्रमाणपत्र दिल्यास आपली पोलीस शिपाई पदावरील नियुक्ती रद्द करुन, सेवासमाप्त करण्यात येईल.

33) अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्यापूर्वी आपणाकडून दिवंगत कर्मचाऱ्यावर अवलंबून असलेल्या कुटूंबातील अन्य व्यक्तींचा सांभाळ करण्याबाबत घेण्यात आलेल्या प्रतिज्ञापत्राचे उल्लंघन केल्यास अथवा कूटूंबातील अन्य सदस्यांनी तक्रार केल्यास चौकशीअंती आपणास सेवेतून काढून टाकण्याची शिक्षा देण्यात येईल.

3. सदर नियुक्तीचे आदेश प्राप्त होताच आपण पोलीस मुख्यालय, पुणे ग्रामीण येथे तात्काळ हजर व्हावे. हजर न झाल्यास आपली निवड रद्द करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आपणास पोलीस दलातील वाटचाली करिता हार्दिक शुभेच्छा !

(संदीप सिंह गिल्ल) भा.पो.से.
पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण.

प्रति,

श्रीमती सोनाली प्रदिप मालुसरे, रा.सर्व्हे नं.16, साईसिद्धी चौक, कुलस्वामिनी दर्शन, फ्लॅट नं.6, आंबेगाव पठार, पुणे -411016 मो.नं.8329399962

प्रत :- 1) राखीव पोलीस निरीक्षक, पोलीस मुख्यालय, पुणे ग्रामीण.

2/- उपरोक्त नवप्रविष्ठ पोलीस शिपाई यांना पोलीस मुख्यालयात हजर करुन त्यांची नोंद आपल्या हजेरी पटावर घ्यावी. हजर झालेल्या उमेदवारांची हजर झाल्याची तारीख व वेळ उलट टपाली या कार्यालयास कळवावी. नवप्रविष्ठ पोलीस शिपाई यांना नियमाप्रमाणे किट सरंजाम किट पेटीसह अदा करावे. तसेच त्यांना राष्ट्रीयीकृत बँकेमध्ये खाते उघडून खाते नंबर लेखा शाखेत सादर करण्याची समज द्यावी.

2) प्रमुख लिपीक, लेखा शाखा, पोलीस अधीक्षक कार्यालय, पुणे ग्रामीण.

2/- शासन निर्णय क्र.अंनियो 1005/126/सेवा-4, दि.31/10/2005 अन्वये, दि.01 नोव्हेंबर 2005 नंतर शासकीय सेवेत नियुक्ती झाल्याचे नप्रपोशि यांचे नवीन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजनेअंतर्गत विहित नमुन्यातील फॉर्म त्वरीत भरुन घ्यावेत. तसेच त्यांचे बँक खाते क्रमांक प्राप्त करुन घेवून प्रचलित नियमांप्रमाणे वेतन व भत्यांची आकारणी करावी.

3) आस्थापना शाखा, आशा-1 अ, लिपीक, पोलीस अधीक्षक कार्यालय, पुणे ग्रामीण

2/- वर नमुद उमदेवाराचे मुळ कागदपत्रे/ प्रमाणपत्रे व सदरच्या नियुक्ती आदेशाच्या आधारे उमदेवाराचे सेवापट तयार करुन प्रमाणित करुन घ्यावे. तसेच सर्व मुळ कागदपत्रे व प्रमाणपत्रे जमा करुन घेवुन उमेदवाराचे जमा केलेल्या कागदपत्राची यादी करुन दुय्यम प्रतिवर उमेदवाराची स्वाक्षरी घेवुन मुळ प्रमाणपत्रे व कागदपत्रे ताब्यात घेवुन प्रशिक्षण संपल्यानंतर उमेदवारास परत करण्यात यावे.

4) प्रभारी अधिकारी, नियंत्रण कक्ष, पुणे ग्रामीण

2/- वर नमूद उमेदवार यांना राखीव पोलीस निरीक्षक, पोलीस मुख्यालय, पुणे यांचेकडे दिनांक /09/2026 रोजी सकाळी 10.00 वाजता किटपेटी व इतर सरंजाम घेणेकामी न चुकता उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात यावे.

5) पोलीस निरीक्षक, सायबर पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण.

2/- वरील नियुक्तीचे आदेश त्वरीत www.puneruralpolice.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात यावे.

6) जिल्हा पोलीस प्रसिद्धीपत्रक, पोलीस अधीक्षक कार्यालय, पुणे ग्रामीण.

प्रत :- अपर पोलीस अधीक्षक, पुणे/बारामती विभाग / पोलीस उप अधीक्षक (मुख्यालय), पुणे ग्रामीण

प्रत सविनय सादर :-

मा.अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

पोलीस शिपाई पदी नियुक्ती आदेश देण्यात आलेल्या उमेदवारांसाठी सूचना
1) **नियुक्ती दिलेल्या उमेदवारांनी मेस करीता रु.5000/- अग्रीम भरणे आवश्यक असल्याने, सदरची रक्कम येताना सोबत आणावी.**
2) **हजर होणाऱ्या उमेदवारांनी त्यांच्या दैनंदिन वापरासाठी आवश्यक असलेले साहित्य उदा.गरजेनुसार आवश्यक असलेले वापरावयाचे कपडे, बाड-बिछाना, जेवणासाठी ताट, वाटी, तांब्या व बादली, मग,वगैरे साहित्य सोबत आणावे.**